श्री व्यंकटेश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सी.ए. परीक्षेत यश

"सी.ए. परीक्षांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश खरोखरच उल्लेखनीय असून महाविद्यालयासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. मे 2024 व नोव्हेंबर 2024 या परीक्षेमध्ये एकूण 17 विद्यार्थ्यांनी हे यश प्राप्त केले आहे. महाविद्यालयाची यशाची परंपरा अशीच सुरू ठेवल्याबद्दल त्यांचे संस्था व महाविद्यालयाकडून अभिनंदन करण्यात येत आहे." असे प्रतिपादन ना.बा. एज्युकेशन सोसायटीचे प्रेसिडेंट श्री. श्रीनिवास बोहरा यांनी केले. ते महाविद्यालयातील सी.ए. परीक्षेमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. महाविद्यालयांमध्ये मे 2024 मध्ये झालेल्या सी.ए. परीक्षेमध्ये गौरव पाटील, ओंकार विभुते, रोनक ओसवाल, गणेश कोष्टी, जगदीश धूत, प्रतीक्षा भागाजी हर्षा बांगड, राधा जाडर, शुभम शहा, वैष्णवी पोरे, ओमकार मिरजे, रितिक जैन यांनी यश मिळवले. तर नोव्हेंबर 2024 मध्ये झालेल्या सी.ए. परीक्षेमध्ये निधी लोया, मंथन पाटील, यश पाटील सार्थक कारवेकर, पलक गांधी यांनी यश प्राप्त केले. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने म्हणाले, " महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीयस्तरावरील या परीक्षेमध्ये मिळवलेले हे यश खरोखरच कौतुकास्पद असून श्री व्यंकटेश महाविद्यालय हे नेहमी विद्यार्थी केंद्रित उपक्रम राबवत असते. यामुळेच महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या परीक्षांमध्ये यशस्वी होत आहेत". यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


श्री. ना. बा. एज्युकेशन सोसायटी संचलित,
श्री व्यंकटेश महाविद्यालय,
सी.ए. परीक्षेमध्ये उज्ज्वल यश प्राप्त केलेल्या सर्व